नियमित दिवाणी दावा क्र.४८/२०१९
दिलीप वि. सविता
सी.एन.आर.क्र.एम.एच.जे.न.०८०००३३४२०१९

**निशाणी क्र.०६ खालील आदेश**
(दिनांक २५/०४/२०२२)

प्रस्तुत अर्ज वादीने न्यायालयीन आयुक्त नेमणुक होणेकरीता केलेला आहे.

२) वादीने असे कथन केले की, वादीने मुळ दावा प्रतिवादी यांनी केलेले अतिक्रमण काढणेसाठी व त्याचा ताबा मिळणेसाठी दाखल केला आहे. गट क्र.३८९ ची मोजणी करावी म्हणुन भुमीअभिलेख कार्यालय, घनसावंगी येथे अर्ज दिला होता. त्यानुसार त्यांनी मोजणी केली. परंतु अतिक्रमणीत क्षेत्र निश्चीत केले नाही. त्यांनी इतर सहहिस्सेदारांच्या जमीनीची मोजणी केली नाही व तसेच गट क्र.३८९ च्या शेजारील गटाची मोजणी केली नाही.

०३) वादीने असे कथन केले की, गट क्र.३८९ मधील अतिक्रमणीत क्षेत्र निश्चित करण्यासाठी वादीच्या जमीनीची मोजणी करुन गट क्र.३८९ च्या शेजारील शेतजमीनची मोजणी करुन व त्यांच्या ताब्यात असेलेल्या प्रत्येकांचे क्षेत्रांचे मोजमाप करुन मोजणी नकाशा व अहवाल सादर करणेसाठी न्यायालयीन आयुक्ताची नेमणुक होणे गरजेचे आहे. करीता भुमापक भुमीअभिलेख कार्यालय, घनसावंगी यांची न्यायालयीन आयुक्त म्हणुन नेमणुक व्हावी, अशी विनंती वादीने केली.

३) प्रतिवादीने त्याचे म्हणणे अर्जाच्या पाठीमागे लिहीलेले आहे. सदर अर्जानुसार न्यायालयीन आयुक्ताद्वारे वादीची व प्रतिवादीची ७/१२ उता–या प्रमाणे मोजणी झाल्यास प्रतिवादीचा आक्षेप नाही असे कथन प्रतिवादीने केले.

४) अर्जाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा अतिक्रमणीत जमीन म्हणजे ०० हे. २६ आर क्षेत्राचा ताबा मिळण्याबाबत दाखल केलेला आहे. वादीने दाखल केलेल्या गट क्र.३८९ च्या ७/१२ उता–याचे अवलोकन केले असता, त्यावर वादी व प्रतिवादी यांचेसह वैजनाथ भानुदास पोपळघट यांचे नाव दिसुन येत आहे. प्रस्तुत अर्जान्वये वादीने गट क्र.३८९ मधील अतिक्रमणीत क्षेत्र

निश्चित करणेसाठी न्यायालयीन आयुक्त यांची नियुक्तीची विनंती केली आहे. सदर बाब लक्षात घेता, न्यायालयीन आयुक्ताची नियुक्ती केल्यास निश्चितच दाव्याच्या परिणामकारक निकालासाठी व उभयपक्षातील वादाचे संपूर्ण निराकरण करण्यासाठी मदत होईल. तसेच, सदर न्यायालयीन आयुक्तची मागणी ही पुरावा गोळा करण्यासाठी केलेली दिसुन येत नाही. करीता, सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. म्हणून खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

| | |
|---|---|
| १ | उपअधिक्षक भुमीअभिलेख कार्यालय, घनसावंगी ता. घनसावंगी, जि. जालना यांना सदर प्रकरणात न्यायालयीन आयुक्त म्हणुन नियुक्त करण्यात येत आहे. |
| २ | न्यायालयीन आयुक्ताने मौजे घनसावंगी, ता. घनसावंगी जि. जालना येथील गट क्र.३८९ तसेच त्याच्या शेजारील शेतजमीनीची मोजणी भूमापन संहिते अन्वये करावी व मोजणी नकाशा तयार करुन सविस्तर मोजणी अहवाल न्यायालयात दिनांक १६/०६/२०२२ पावेतो सादर करावा. |
| ३ | मोजणीसाठी आवश्यक दस्तऐवज पुर्तता उभयपक्षांनी तात्काळ करावी. |
| ४ | न्यायालयीन आयुक्ताचा आवश्यक तो खर्च वादीने सोसावा व तो खर्च भूमी अभिलेख कार्यालय, घनसावंगी येथे भरावा. |
| ५ | न्यायालयीन आयुक्त नियुक्तीची पत्र देण्यात यावे. |

SACHIN BHAGVAT SHIRSATH

Digitally signed by SACHIN BHAGVAT SHIRSATH
Date: 2022.04.25 13:22:56 +0530

दिनांक २५/०४/२०२२

(**स. भा. शिरसाठ**)
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
घनसावंगी